# नाशिक महानगरपालिका, नाशिक
# सार्वजनिक आरोग्य विभाग
# ई-निविदा सुचना क्रमांक. /२०२२-२०२३

नाशिक महानगरपालिकेच्या खालील नमुद कामाकरिता अनुभवी मक्तेदारांकडून (ई-टेंडर) ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहे.

**कामाचे नाव:-**

**सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारित असलेल्या मनपा रुग्णालयांमध्ये रुग्णांची वस्त्र धुलाई करणे.**

| **कामाचेनाव :** सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारित रुग्णालये/दवाखाने/प्रसुतीगृहे /कोविडकेअरसेंटर येथील रुग्णांची वस्त्र धुला ईकरणे. | |
|---|---|
| निविदा प्रसिध्दी दिनांक | ०८/ ०४/२०२२ |
| निविदा पूर्व बैठक | १३ / ०४ /२०२२ दुपारी ४.०० वाजता |
| निविदा भरणे अंतिम दिनांक | २६ / ०४/२०२२ दुपारी ४.०० वाजता |
| तांत्रिक निविदा उघडण्याचा दिनांक | २७/ ०४/२०२२ दुपारी ४.०० वाजता |
| निविदा फी (१००००/- + ९०/- जीएसटी %) | ११,९१० र.रू. |
| बयाणा रक्कम | १,००,०००/- |

**निविदापूर्व बैठक ठिकाण** :- आरोग्य (वैद्यकिय) अधिकारी दालन,सार्वजनिक आरोग्य विभाग, मुख्यालय ३ रा मजला, राजीवगांधीभवन,नाशिकमहानगरपालिका, नाशिक.

**निविदा अटीशर्ती**

१. नाशिक महानगरपालिका कार्य क्षेत्रातील नाशिक (पुर्व) नाशिक (पश्चिम), नाशिकरोड, सातपुर, पंचवटी व सिडको या ६ विभागातील महानगरपालिकेच्या वेगवेगळ्या रुग्णालयात वस्त्र धुलाई इस्त्री करून देने निविदा धारकास बंधनकारक राहिल. यामध्ये वस्त्र घेऊन जाणे परत देऊन जाणे यासह वाहतुक खर्च व इतर सर्व खर्च समाविष्ट राहतील.
२. संस्था नोंदणी प्रमाणपत्र/ शॉप ॲक्ट प्रमाणपत्र बधंनकारक.
३. गेल्या ३ वर्षात शासकिय / निमशासकीय संस्थामध्ये वार्षिक किमान १६ लक्ष रु.चे कामकाज वस्त्रधुलाई सेवा कामाचा अनुभव प्रमाणपत्र अनुभवाच्या तपशिलासह.
४. भविष्यनिर्वाह निधी नोंदणी प्रमाणपत्र बधंनकारक.
५. लाँड्रीचा सविस्तर प्लॅन सादर करणे आवश्यक.
६. उपलब्ध मशिनचे नाव, मेक ची संपुर्ण माहिती सोबत जोडणे आवश्यक
    - ऑटोमेटिक वॉशर व एक्स्ट्रेक्टर
    - रोटरी ड्रम ड्रायर
    - स्टीम प्रेस (न्युमॅटीक प्रेस)
    - बॉइलर
७. निविदा धारकाकडे फॅक्टरी ॲक्ट प्रमाणे सुरक्षायंत्रणा असणे आवश्यक.
८. लाँड्री मध्ये अग्निरोधक, प्रतिबंध सिस्टीम असणे आवश्यक.
९. लाँड्री व्यवसायाचे आय.एस.ओ. सर्टिफिकेट असणे आवश्यक.
१०. निविदाधारकाने किमान स्व मालकीचे 1 (एक) मालवाहतुक करणारे ट्रान्सपोर्ट परमिट असणारे वाहन असणे आवश्यक R.C Bookजोडावे.
११. निविदांधारकांनी त्यांच्या निविदा ई-टेंडरींग पध्दतीनेच सादर कराव्यात. निविदा भरतांना ई टेंडरींग पध्दतीनेखालीलप्रमाणे निविदे सोबत लागणारी कागदपत्रे सादर करणेत यावी व प्रत्येक निविदा प्र-पत्रात नमुद केलेली इसारा रक्कम. निविदा प्रपत्र किंमत, जीएसटी व इतर खर्च निविदे सोबत असणारे फार्ममध्ये नमुद करुन ऑनलाईन पध्दतीनेच भरणे आवश्यक आहे.
१२. पुर्व पात्रता अटी-शर्ती- वर नमुद कामाचा मक्ता घेणेसाठी मक्तेदार यांचे स्थानिक कार्यालय स्वत:चे किंवा भाड्याचे असणे बंधनकारक आहे. नसल्यास करारनामा करणेपूर्वी ते प्रस्थापित करणे बंधनकारकराहील. तसेच मक्तेदार हा भविष्य निर्वाह निधी राज्यकामगार विमा योजना (ई.एस.आय.सी.),व्यवसाय कर,वस्तु व सेवाकर इत्यादी ठिकाणी नोंदणीकृत असावा.
१३. कामाचा सविस्तर तपशिलनिविदेतील अटीशर्ती नुसार असेल.
१४. कामाची निविदा फॉर्म व निविदा बयाणा ऑनलाईन पद्धतीने भरून त्याची मूळ पावती निविदा भरते वेळी स्कॅन करुन सादर करावी.
१५. सुरक्षा अनामत- निविदा रकमेच्या ५ टक्के भरावी लागेल. यापैकी २.५टक्के मनपा खजिन्यात रोखीने/फिक्स डीपॉझीट/ बँक गॅरंटी (राष्ट्रीयकृत बँकेची व नाशिक मनपा यांचे नावे) करारनाम्यापुर्वी व उर्वरित २.५ टक्के देयकातून वेळोवळी वजा करण्यात येईल.

१६. अतिरिक्त सुरक्षा अनामत र.रु:- ५ लक्षची बँक गॅरेंटी करारनाम्यापुर्वी सादर करावी. बयाणा रक्कम व सुरक्षा अनामतीवर कुठल्याही प्रकारचे व्याज अनुज्ञेय नाही.

१७. कामाचा कालावधी - कार्यादेश मिळालेपासून ३ वर्ष.

१८. कार्यादेश मिळाले पासुन प्रथम वर्षी दर वाढ लागु राहणार नाही परंतु दुसया वर्षी पासुन मागील आर्थिक वर्षातील दरा वर २ % दर वाढ लागु राहील.

**<u>कामाचे ठिकाण</u> :- नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नाशिक (पुर्व) नाशिक (पश्चिम), नाशिकरोड, सातपुर, पंचवटी व नविन नाशिक (सिडको) या ६ विभागातील नाशिक महानगरपालिकेचे रुग्णालय, दवाखाने व प्रसुतीगृहे.**

**<u>ई-निविदा भरण्याची पध्दत</u>**

| अ.क्र. | कागद पत्रांचा तपशिल | सोबतजोडलेलाआहे. |
|---|---|---|
| | अ- <u>टेक्नीकल बिड पाकिट क्रमांक</u>**१** | |
| १) | निविदा धारकाचे संपुर्ण माहिती यात संस्थेचे कार्यालय व पत्ता, दुरध्वनी क्रमांक, मोबाईल क्रमांक व संस्थेचा नोंदणी क्रमांक व कार्यालयीन संपर्काचा ई-मेल याची नोंद असावी.**परिशिष्ट "अ"** | |
| २) | बयाणा रक्कम EMD ऑनलाईन भरुन त्याची पावती ऑनलाईन निविदा भरतेवेळी स्कॅन करुन सादर करावी. | |
| ३) | संस्थेच्या नावाने राज्य कामागार विमा योजना (ईएसआयसी) कार्यालयाकडील नोंदणी प्रमाणपत्र वमागील ६ महिन्याच्या पावात्या सादर करावे. | |
| ४) | संस्थेच्या नावाने जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्र व मागील ६ महिन्यांचे विवरण पत्रके | |
| ५) | संस्थेच्या नावाने व्यवसाय कर नोदंणीकृत प्रमाणपत्र | |
| ६) | निविदा धारकांवर मागील ३ वर्षात कोणत्याही स्वरुपाचा गुन्हा दाखल झाले नसल्याचे स्वता:चे हमी पत्र.**परिशिष्ट "ब"** | |
| ७) | संस्थांची आर्थिक स्थिती मागील तीन वर्षाच्या उलाढालीसह (सन २०१८-२०१९, २०१९-२०२०, व २०२०-२०२१)<br>१) ताळेबंद (२) नफा-तोटा पत्रक इत्यादीसह तसेच संस्थेची तीन वर्षांमध्ये वार्षिक सरासरी उलाढाल रुपये ५० लाखांपेक्षा कमी नसल्याचे चार्टेड अकौटंट यांचेकडील सर्टिफिकेट बंधनकारक. | |
| ८) | निविदेतील अटीशर्ती मंजूर असले बाबतचे सोबतचे दिलेले पत्र. **परिशिष्ट "क"** | |
| ९) | निविदाधारकास शासनाच्या कोणत्याही विभागामार्फत काळया यादीत टाकलेले नाही या बाबतचे १०० रु.स्टॅम्प पेपर वर देण्यात यावा. | |
| १०) | शॉप ॲक्ट प्रमाणपत्र . | |
| ११) | गेल्या ३ वर्षात शासकिय / निमशासकीय संस्थामध्ये वार्षिक किमान १६ लक्ष रु.चे कामकाज वस्त्रधुलाई सेवा कामाचा अनुभव प्रमाणपत्र अनुभवाच्या तपशिलासह. | |
| १२) | भविष्य निर्वाह निधी नोंदणी प्रमाणपत्र. | |
| १३) | पॅन कार्ड. | |
| १४) | व्यवसाय कर नोदंणी प्रमाणपत्र. | |
| १५) | लाँड्रीचा सविस्तर प्लॅन. | |
| १६) | निविदा धारकाकडे फॅक्टरी ॲक्ट प्रमाणे सुरक्षायंत्रणा सर्टिफिकेट. | |
| १७) | निविदा धारकाने किमान स्व मालकीचे 1 (एक) मालवाहतुक करणारे ट्रान्सपोर्ट परमिट असणारे वाहन असणे आवश्यक R.C Book जोडावे. | |
| १८) | लाँड्री व्यवसायाचे आय.एस.ओ. सर्टिफिकेट. | |

उपरोक्त अनुक्रमांक १ ते १८ मधील सर्व कागदपत्रे दिलेल्या क्रमवारीनुसारच ऑनलाईन अपलोड करावे. सदर कागदपत्रांची छाननी करताना त्यांच्या मुळप्रती तपासणीसाठी मागणी केल्यास ते सादर करणे बंधनकारक राहील.

**ब** -आर्थिक देकार (फायनंशियल  बिड)

१. आर्थिक देकार भरतांना निविदा संच खरेदी केल्यानंतर त्यामधील अटीशर्ती मंजूर असल्यास आपले आर्थिक देकार भरुन ऑनलाईन अपलोड करावयाचे आहे.
२. निविदा दाखल करण्याच्या अंतिम तारखेच्या व वेळेच्या आत निविदाधारकास इंटरनेट वरुन केव्हाही निविदा दाखल करता येतील.
३. आर्थिक देकार हे सर्व सद्यस्थितीतील व निविदा कालावधीतील वाढणारे सर्व कर, दर व इतर खर्च विचारात घेऊन देण्यात यावे.
४. दिलेल्या वेळेच्या पुर्वीच निविदा दाखल करणे बंधनकारक आहे व त्यामुळे मक्तेदाराने शेवटच्या क्षणी निविदा अपलोड झाली नाही अशी तक्रार आल्यास ती तक्रार विचारात घेतली जाणार नाही.
५. लिफाफा  क्रमांक २ प्राईज बिड असे नमुद करण्यात यावे (लिफाफा क्रमांक १ मधील कागदपत्रे अपुर्ण असल्यास लिफाफा क्रमांक २ उघडण्यात येणार नाही)
६. पाकीट क्र.१ उघडल्यानंतर कागदपत्रे पडताळणी केल्यानंतर पात्र मक्तेदारच्याच निविदा आर्थिक देकार पाकीट क्र. २ उघडण्यात येईल.
७. उघडलेल्या निविदेत किमान देकार असलेल्या देकाराबाबत मा.आयुक्त साहेब अथवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी हे मक्तेदारासोबत दिलेल्या देकाराबाबत चर्चा करुन निर्णय घेतला जाईल.
८. कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारणे या बाबतचे अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांनी राखून ठेवले आहे.
९. निविदेमधीलकुढलेहीअटी/शर्तीबदल्याण्याचे/वगळण्याचे/समावेशकरनेचेअधिकारमा. आयुक्तयांनीराखुनठेवलेल्या आहे.
१०. निविदाकोणत्याहीस्थरावररद्दकरण्याच्याअथवामुदतवाढदेण्याच्याअधिकारमा. आयुक्तयांनीठेवलेला आहे.

निविदा उघडण्याची पध्दत:- निविदा मा.आयुकत/ मा. अति.आयुक्त (शहर)यांचे समक्षऑनलाईनउघडण्यात येईल.

**कामाचे स्वरूप**

- शस्त्रक्रिया गृहातून व प्रसुतीगृहातून रक्ताने माखलेली सर्व वस्त्रे वेगळया लॉन्ड्री बॅगमध्ये (पिवळ्या रंगाच्या प्लास्टिक बॅगमध्ये) गोळा करून ती प्रथम १.५ टक्के सोडियम हायपोक्लोराईड ३० मिनिटे बुडवुन ठेवावे, रक्ताने माखलेल्या वस्त्रांचे निर्जंतुकीकरण करताना हातमोजे वापरावे.
- निर्जंतुक केलेली तसेच निर्जंतुकीकरण न करावी लागणारी वस्त्रे वेगळ्या लॉन्ड्री बॅगमध्ये धुण्यासाठी घेऊन जाणे.
- लहान कपडे जसे  सर्जन मास्क, स्पंज,खोळी,ड्रा शिट, ड्रा टॉवेल, पेशंट ब्लाऊज, अब्डोमिनल शिट, ऑपरेशन टॉवेल, लहन टॉवेल, सर्जन कॅप, तुर्की टॉवेल, नॅफ्कीन,
- मध्यम कपडेजसे सर्जन गाऊन,डॉ. पॅन्ट, डॉ. शर्ट, पेशंट शर्ट, पेशंट पायजमा, पेशंट परकर, मोठे टॉवेल, पेशंट गाऊन, प्लेन शिट, होलशिट (हिरवे),तुकडा कपडा,टेबल कापड,पेशंट साडी ,वगैरे.
- मोठे कपडे जसेबेडशिट,मच्छरदाणी,लहान मोठे ब्लँकेट्स, सोलापुरी चादरी,  सतरंजी, बेडसाईड पडदे, खिडक्याचे पडदे, वगैरे.
- वस्त्र धुलाई करीता योग्य प्रमाणात साबण व वॉशिंग पावडरचा उपयोग करणे.
- वस्त्रांची धुलाई यंत्राच्या सहाय्याने करणे.
- शस्त्रक्रिया गृह व प्रसुती कक्षातील वस्त्रांची धुलाई स्वतंत्ररित्या करण्यात यावी.
- धुतलेली वस्त्रे यंत्राच्या सहाय्याने किंवा उन्हात वाळविणे
- वाळविलेल्या वस्त्रांना इस्त्री करणे
- नोंदवही ठेऊन त्यात वस्त्रांची देवाण घेवाण धुलाईकरीता वापरण्यात आलेला साबण, डिटर्जंट याबाबतचा तपशिल नोंदवून ठेवावा. तसेच सदरची नोंदवही मागणीनुसार वरिष्ठांच्या तपासणीसाठी उपलब्ध करुन दयावी लागेल.
- सदरच्या कामाचा ठेका ३ वर्ष कालावधीसाठी राहील. मनपाला गरजेनुसार ठेक्याची मुदत संपल्यानंतर आवश्यक त्याकालावधीसाठी मंजुर दराने धुलाईचे काम करणे बंधनकारक राहील.
- निविदा दर सर्व करांसहित सादर करावे.

# नाशिक महानगरपालिका, नाशिक
# सार्वजनिक आरोग्य विभाग
# ई-निविदा सुचना क्रमांक. /२०२२-२०२३

## देकार पत्रक

**कामाचे नाव:-**

**सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारित असलेल्या मनपा रुग्णालयांमध्ये रुग्णांची वस्त्र धुलाई करणे.**

| अ . .क्र | तपशील | प्रतिनगदर (सर्व कर व खर्चासहीत) |
|---|---|---|
| १. | छोटे कापडांचा गट | |
| २. | मध्यमकापडांचा गट | |
| ३. | मोठे कापडांचा गट | |

निविदा धारकाचे नांव व पत्ता

निविदा धारकाची सही व शिक्का

## इतर अटी/शर्ती

१. मंजुर झालेल्या निविदाधारकास द्वितीय (SUBLET) कंत्राटदार नेमून निविदेचे काम करता येणार नाही तशी बाब निर्दशनास आल्यास देण्यात आलेला वार्षिक ठेका त्याच क्षणी कोणतीही पूर्वसूचना न देता रद्द करुन त्याचे विरुध्द कायदेशीर कारवाई करणेत येईल तसेच निविदाधारकाची अनामत रक्कम कोणतेही कारण न देता जप्त करण्यात येईल.

२. सदर काम अत्यावश्यक सेवेत मोडत असल्याने सदरचे काम निविदाधारकाला कोणत्याही परिस्थितीत नाशिकमहानगरपालिकेला ९० दिवसांची पूर्वसूचना दिल्याशिवाय बंद करता येणार नाही अथवा एकतर्फी कंत्राट सोडून देता येणार नाही. तसे केल्यास निविदाधारकाची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व देय असलेली देयके अदा करण्यात येणार नाही. व कंत्राट धारकाचे नाव काळया यादीत टाकण्यात येईल.

३. आवश्यकतेनुसार कामाचा कालावधी वाढवून दिल्यास निविदाधारकाने मंजूर निविदा दरानेच वाढीव कालावधीसाठी याच निविदेतील अटीशर्ती नुसार काम चालू ठेवणे बंधनकारक राहील.

४. निवड झालेल्या निविदाधारकास महानगरपालिके बरोबर ठरवून दिलेल्या कामाचा करारनामा प्रचलित स्टॅम्प डयुटी नियमानुसार निविदाधारकाचे स्वखर्चानेस्टॅम्प पेपरवर करुन द्यावा लागेल. करारनामा झाल्यानंतरच कार्यादेश देण्यात येईल.

५. निविदा कालावधीत आवश्यक धुलाई साहित्य व उपकरणांचा अभाव व तसेच काम व इतर बाबी असमाधानकारक आढळूनआल्यास पंधरा दिवसांची लेखी नोटीस देवून सदरचा ठेका रद्द करण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवलेला आहे.

६. निविदाधारकाने दिलेला दर प्रशासनास अवास्तव वाटल्यास निविदाधारकाचा खुलासा घेवून सदर खुलासा समाधानकारक नसल्यास निविदा रद्द करण्याचा अधिकार मनपा प्रशासनास राहील. निविदेमध्ये दिलेले दर प्रत्यक्ष कामाच्या व्याप्तीचा विचार करुन सुसंगत आहे किंवा नाही याची पडताळणी करुन निर्णय घेण्यात येईल.याबाबत मा.आयुक्त, नामपा, नाशिक यांचा निर्णय अंतिम राहील.

७. निविदा मंजूर झाल्यास ठेकेदाराने दिलेल्या वार्षिक निविदा रकमेच्या ५% अनामत रकमेपैकी २.५ % सुरक्षा अनामत फिक्स डिपॉझिट /बँक गॅरंटीच्या स्वरुपात किंवा सदर रक्कम मनपा खजिन्यात जमा करावी लागेलव उर्वरीत २.५% सुरक्षा अनामत ही निविदाधारकाच्या देयकामधून कपात करण्यात येईल.सुरक्षा अनामत रकमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही. निविदा समाप्तीनंतर सदर कामाबाबत अंतिम लेखापरिक्षण आक्षेप नसल्यास ६ महिने नंतर सुरक्षा अनामत मागणी केल्यावर परत देय राहील.

८. निविदाधारकाने त्यास सोपविलेले काम समाधानकारक झाल्याबद्दल नाशिक मनपा चे संबंधित पर्यवेक्षकयांनी प्रमाणित केलेशिवाय देयक अदा केले जाणार नाही.

९. निविदाधारकाने प्रचलित शासकीय नियमानुसार वेळोवेळी घ्यावे लागणारे नोंदणी प्रमाणपत्र, परवाने त्या त्या संबधीत कार्यालयाकडुन स्वत:च्या जबादारीवर घ्यावे लागतील.

१०. निविदा स्विकार करतांना निविदाधारकाची कोणतीही अट स्विकारली जाणार नाही. मक्तेदाराने शेवटच्या क्षणी निविदा अपलोड झाली नाही अशी तक्रार आल्यास ती तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

११. कोणतीही निविदा अंशत: अथवा पूर्णत: स्विकारणे, अथवा पूर्णत: नाकारणे अथवा रद्द करणे याचा अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवलेला आहे. त्यासाठी कोणतेही कारण दिले जाणार नाही.

१२. सदरचे कामांस वस्तु व सेवाकर लागू असल्यास सदरचा वस्तु व सेवाकर किंवा इतर कोणताही शासकीय कर अदा करण्याची पूर्ण जबाबदारी मक्तेदाराची राहील.

१३. कंत्राटदाराचे देयक अदा करणेकामी लेखा विभाग, लेखापरिक्षण विभाग यांना आवश्यक असलेल्या मक्तेदाराकडील कागदपत्रांची पूर्तता करुन देण्याची जबाबदारी मक्तेदाराची असेल.

१४. निविदाधारकाने निविदा भरतांना निविदेतील नमुद कामाचे व्याप्ती नुसार प्रत्यक्ष स्थळ पहाणी करुन तसेच सर्व कर व दर याचा विचार करुन देकार पत्रकांमध्ये दरनमुद करावयाचे आहे.

१५. उपरोक्त निविदा अटी शर्तीमध्ये वाढ करणे व नविन अट समाविष्ट करण्याचा अधिकार मा.आयुक्त सो/ खातेप्रमूख यांना आहे व त्याची अंमलबजावणी मक्तेदारावर बंधनकारकराहील.

१६. सदरचे कामाबाबत मक्तेदार व मनपामध्ये कुठल्याही विषयाबाबत वाद निर्माण झाल्यास सदर वादाबाबत आयुक्त सो. नाशिकमनपा यांचा निर्णय निविदाधारक यांचेवर बंधनकारक राहील.

१७. नियमानुसार आवश्यक त्या सर्व वजावटी देयकातून करणेत येतील.

१८. सदर कामातील कुठलाही वाद हा नाशिकचे न्याय कक्षेतच असेल

१९. मक्तेदाराने मनपाच्या नावाचा कुठल्याही प्रकारचा गैरवापर होणार नाही याची दक्षता घ्यावी.

२०. निविदा ग्राह्यता कालावधी निविदा उघडल्यापासून १२० दिवस राहील.

२१. दिलेल्या निविदा फार्म मध्येच दर भरण्यात यावे.

२२. दरात खाडाखोड केल्यास विचार केला जाणार नाही.
२३. सदरची निविदाची वैधता कालावधी निविदा उघडल्यापासुन १८० दिवसांचा राहील.
२४. कंत्राट कालावधीत कोणत्याही प्रकारचा वादविवाद झाल्यास मा. आयुक्त, मनपा, नाशिक यांचा निर्णय अंतीम राहील.
२५. निविदा फॉर्ममधील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत निविदाधारकाने वैद्यकिय आरोग्य अधिकारी, नाशिक यांचेशी रु. १५००/- च्या मुद्रांक शुल्क पत्रावर रितसर करारनामा करावा लागेल.
२६. करारनाम्याचा कालावधी करार केलेपासून ३ वर्षांसाठी असेल. मनपाच्या मान्यतेच्या आधीन करारनाम्याचे पुढील कालावधीसाठी नुतनीकरण करण्यात येईल. करार कालावधीत उक्त निविदाधारकाकडून करारातील अटी शर्तीचे उचित पालन होत नसल्याचे निदर्शनास आल्यास 3 दिवसांची लेखी सुचना देऊन करार रद्द करणेचा अधिकार मा. आयुक्त सो. मनपा यांचा राखून ठेवण्यात येत आहे.
२७. वस्त्रधुलाई कर्मचा-यास निविदाधारकाकडून देण्यात येणा-या वेतनाबाबत राज्य शासनाच्या किमान वेतन अधिनियामातील तरतुदींचा भंग झाल्यास किंवा अनुचित कामगार प्रथा अवलंबिली गेल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी निविदाधारकाची असेल.
२८. किमान २५ लाखांची राष्ट्रीयकृत बँकेची सोलव्हंसी सर्टिफिकेट बंधनकारक.
२९. गेल्या ३ वर्षात शासकिय / निमशासकीय संस्थामध्ये वार्षिक किमान १६ लक्ष रु.चे कामकाज वस्त्रधुलाई सेवा कामाचाअनुभव प्रमाणपत्र अनुभवाच्या तपशिलासह जोडावे.
३०. राज्य कामगार विमा योजना कर यांचे माहे नोव्हेंबर २०२० ते २०२१ चे भरलेले चलन.
३१. जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्र व मागील ६ महिन्यांचे विवरण पत्रके सादर करणे आवश्यक
३२. वापरण्यात येणा-या धुलाई पावडर/डिटरजंट ची संपूर्ण माहिती देणे आवश्यक.

Sd/-
वैद्यकिय आरोग्य अधिकारी
नाशिकमहानगरपालिका,नाशिक

Sd/-
अति.आयुक्त (सेवा)
नाशिक महानगरपालिका, नाशिक

## परिशिष्ट 'अ''
## निविदाधारकाची माहिती

दिनांक :    /    / २०२२

(निविदाधारकाने लेटहेडवर खाली दिलेली माहिती सादर करावी. जेथे लागू नसेल तेथे लागू नाही याची नोंद करणे आवश्यक आहे.)

१. निविदाधारकाचे नाव, पत्ता व नोंदणीकृत मुख्य कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक :

२. फर्म आणि भागीदारांचा ई-मेल आयडी

३. आपत्कालीन परिस्थितीत संपर्क करावयाच्या अधिकारी यांचे नाव, पद, पत्ता व दूरध्वनी क्रमांक:

४. निविदाधारक यांचे बँक खात्याची माहिती :-

बँकेचे नाव :-
शाखा :-
खाते प्रकार :-
खाते नंबर :-
आयएफएससी कोड एमआयसीआर कोड :-

**निविदाधारकाचे संपुर्ण नाव,**
**पत्ता, सही व शिक्का**

## परिशिष्ट 'ब'

प्रति,
मा. आयुक्त सो.
नाशिक महानगरपालिका यांस

आपण निविदेत नमुद केलेप्रमाणे निविदाधारक,___________________________________ माझेवर/आमचेवर कोणताही प्रकारचा फौजदारी गुन्हा दाखल नाही, हे प्रमाणित करण्यात येत आहे. तसेच माझा/आमचा काळया यादीत समावेश नाही.

निविदा धारकाचे नाव, पत्ता व स्वाक्षरी

(टिप: सदर परिशिष्ठ ‘ब’ हे १०० रू. च्या स्टॅम्प पेपरवर ॲफेडेव्हिट करून सादर केल्यानंतरच गृहित धरण्यात येईल.)

## परीशिष्ठ "क"

प्रति ,
मा .आयुक्त सो .,
नाशिक महानगरपालिका, नाशिक .

निविदेचे सर्व अटी व शर्ती मला मान्य असून मी सर्व माहिती घेवूनच हे निविदा पत्रक भरले आहे. निविदा मंजूर झाल्यास महापालिकेच्या मागणीप्रमाणे सर्व मालाचा पुरवठा करण्यात येईल. तसेच, निविदेचे सर्व अटी व शर्ती मला/आम्हांस बंधनकारक आहेत. तसेच आम्ही सादर केलेली सर्व कागदपत्रे खरी असून, यात काही खोटे आढळल्यास आमची निविदा रद्द केली जाईल व महानगरपालिकेची फसवणुक केल्याबदद्ल कायदेशीर कारवाई केली जाईल यांची आम्हास पुर्ण कल्पना आहे.

निविदा धारकाचे नांव व पत्ता

निविदा धारकाची सही व शिक्का